
साहित्य प्रतिष्ठान

# मावळा

लेखक – श्री. दामोदर मगदूम

भाग–२



मावळा

ई-पुस्तक - मावळा

भाग - २ रा

लेखक - दामोदर मगदूम

प्रकाशक - ई साहित्य प्रतिष्ठान

मांडणी-सजावट - सचिन काकडे

रेखाटन – चेतन पाउलझगडे

**संपर्क**

ई साहित्य प्रतिष्ठान

जी ११०२, ईटर्निटी

मॅरेथान चौक

ठाणे - ४००६००४.

☎ ९८६९६७४८२०

www.esahity.com

www.marathiriysat.com

esahity@gmail.com

© २०१२
सर्व हक्क **ई साहित्य प्रतिष्ठान आणि लेखकाच्या** स्वाधीन.



ई साहित्य प्रतिष्ठान

## दोन शब्द . . .

छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या मराठी साम्राज्याचा विस्तार अटकेपार करताना अनेक मावळे धारातीर्थी पडले. सह्याद्रीच्या गडकिल्ल्यावरील बुरुजांसारखी अभेद्य निष्ठा असलेल्या मावळ्यांनी महाराजांवरील श्रध्दा आणि स्वराज्यप्रेमापोटी जीवाची पर्वा केली नाही. त्यांचे बलिदान , पराक्रम स्वराज्यासाठीचा त्याग आजही सर्वांसाठी स्फुर्तीदायक आहे.

सदर पुस्तक मालिका असाच ज्ञात अज्ञात मावळ्यांच्या पराक्रमावरील आढावा आहे. या पुढील पुस्तकात आपण आणखी काही मावळ्यांचा पराक्रमाचा अनुभव घेउ.

जय भवानी !! जय शिवाजी !!


www.marathiriyasat.com



# येसाजी कंक

येसाजी वेलवंड खोऱ्याचे प्रतिष्ठित देशमुख होते.शिवाजीराजें तसेच शंभूराजेंचे जवळचे सहकारी होते.शिवाजीराजेंच्या दक्षिण दिग्विजयच्या मोहिमेत ते राजेंसोबत होते.छत्रपतीच्या आदेशानुसार येसाजीने गोवळकोंड्याचा बादशाह अबुलहसन कुतुबशाह याच्या मदमस्त हत्तीला आपल्या अतुल्य पराक्रमाने लोळवले होते.अनेक विजयी मोहिमेचे नेतृत्व येसाजींनी केले होते.

शिवाजीराजेंनंतर शंभूराजेंसोबत त्यांनी फोंड्याला पोतुर्गीजाना पाणी पाजले या युध्दाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.गोवा जिंकल्यावर शंभूराजेंनी पोर्तुगीजशी तह केला होता.पण औरंगजेबने,कुडाळच्या सावंतने तसेच वेंगुर्ल्याच्या देसाईने,पोर्तुगीजांना फितवून फोंडा किल्यावर आक्रमण करावयास लावले.त्यावेळी फोंडा किल्याचा किल्लेदार येसाजी कंक हा होता.पोर्तुगीजांनी जोरदार आक्रमण करून फोंडा किल्यास भगदाड पाडले.यावेळी किल्यात फक्त आठशे मावळे होते.



पोर्तुगीजांनी किल्याच्या भगदाडातून आत प्रवेश केल्यानंतर येसाजी त्याचा पुत्र कूणाजी व मावळयांनी असा पराक्रम केला की पोर्तुगीजांची दाणादाण उडाली.पण पोर्तुगीजांची संख्या मोठी असल्यामुळे मराठ्यांचा टिकाव लागेना.याचवेळी शंभूराजें येसाजीच्या मदतीस एक हजार घोडदळ व तितकेच पायदळ घेऊन आले.त्यामुळे मराठ्यांना अधिक चेव चढला.मराठ्यांपुढे पोर्तुगीजांचा टिकाव लागला नाही त्यांचा पराभव झाला. या युध्दात येसाजी कायमचे जायबंदी झाले तर त्यांचा पुत्र कृष्णाजी युध्दात मारला गेला. या युध्दात पराक्रम गाजविल्याबद्दल शंभूराजेंनी येसाजीस एक हजार होन नेमणूक देऊन त्यांचा सन्मान केला.

# शिवा काशिद

अफजलखानाच्या वधानंतर आदिलशाहने सिद्दी जोहरला शिवाजीराजेंविरूध्द धाडले.दि २ मार्च १६६० साली,सुमारे २०००० घोडेस्वार आणि ३५००० पायदळ घेऊन सिद्दी शिवरायांवर चालून आला.त्यावेळी महाराज पन्हाळा किल्ल्यावर होते.सिध्दीने पन्हाळा किल्ल्यास वेढा घातला.महाराज गडावर अडकून पडले.तिकडे शाहिस्तेखान पुण्यात लालमहालात तळ ठोकून होता.स्वराज्यावर मोठे संकट आले होते.पावसाळयाचे दिवस होते पन्हाळा किल्ल्यावर जास्त दिवस थांबणे धोक्याचे होते.कारण राजेंना शाहिस्तेखानाचा बंदोबस्त करावयाचा होता.

हिरडस मावळातील शूर अशा बांदलाचा सहाशे जणांचा जमाव राजेंनी निवडला.पालखीसाठी भोई सुध्दा खासे निवडले.सिध्दीस तहाचा समझोता धाडून राजेंनी त्यास गाफील ठेवले.छत्रपती सारख्या दिसणाऱ्या शिवा काशिदला राजेंनी पालखीत बसवून मलकापुरच्या दिशेने पाठविले,तर राजेंची पालखी म्हसाई पठाराच्या दिशेने गेली.मुसळधार पावसाचा फायदा घेत राजे पन्हाळयावरून निसटले.सिध्दी जोहरला याचा थांगपत्ता लागला त्याने पाठलाग करून राजेंची पालखी पकडली.शिवाजीराजे आपल्या ताब्यात आल्यामुळे सिध्दी खुशीत होता पण लवकरच त्याला कळून चुकले की आपण शिवा काशिद नावाच्या मावळयाला पकडले आहे.

सिध्दीने त्यास विचारले की त्यास मरणाचे भय वाटत नाही का?त्यावर शिवा काशिद म्हणाला की शिवाजी राजेसाठी मी हजार वेळा मरावयास तयार आहे,शिवाजी राजे कोणास सापडणार नाहीत.हे उत्तर ऐकून रागाने सिध्दीने शिवा काशिदचे शीर कलम केले.इतिहास ही त्याचा पराक्रम विसरु शकणार नाही.



मावळा

शिवा काशिद सारख्या मावळयाच्यामुळेच व त्याच्या बलिदानामुळेच स्वराज्याचे देखणे स्वप्न शिवाजीराजे साकार करु शकले.

## पन्हाळगडावरील शिवा काशीद यांचे स्मारक



साहित्य प्रतिष्ठान®

# जीवबा महाला

जीवबा महाला यांचे संपुर्ण नाव जीवा महाला संकपाळ.महाबळेश्वराच्या पायथ्याशी असलेले कोंडवळी हे त्यांचे गाव होय.जातीने जीवा न्हावी होते.प्रतापगडाच्या रणसंग्रामावेळी छत्रपती शिवरायांचे ते अंगरक्षक होते.

सभासद बखरीत प्रतापगडाच्या लढाईचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे,छत्रपतींनी उजवे हातचे बिचवियाचा मारा चालवून खानाची चरबी बाहेर काढली व चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले.इतक्यांत सैदबंडा पटाईत धावला.त्यानें राजे जवळ केले.पट्याचे वार राजियावरि चालविले.तो राजियांने जिऊ महालिया जवळील आपला हुद्दियाचा पट्टा घेऊन,पट्टा व विचवा असे कातर करून सैदबंडा याचे चार वार ओढले.पांचवे हाताने राजियास मारावें तो इतकियांत जिऊ महाला याणे फिरंगेनें खांद्यावरि सैदबंडियासि वार केला.तो पट्टियाचा हात हत्यारा समेत तोडिला.आणि खानाचे शीर घेऊन राजे सिताब गडावरि जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले.

यावरून 'होता जिवा,वाचला शिवा' ही उक्ती झाली.पुढे हुकूमाची अवज्ञा केल्याबद्दल छत्रपतींनी जीवा महालास दुर केले.सन १७०९ साली जीवा महाला मरण पावला.



मावळा

# जीवा महाला यांची रोहिडा किल्ल्यावरील समाधी



साहित्य प्रतिष्ठान

मावळा

# संभाजी कावजी

छत्रपती शिवाजी राजेंचा हा अंगरक्षक होता.संभाजी कावजीने प्रतापगडाच्या रणसंग्रामावेळी पळून जाणाऱ्या अफजलखानाचे शीर कापले होते.अंगाने धिप्पाड व मजबूत असलेल्या कावजीने घोड्यास चार पायावर उचलले होते.हणमंतराव मोऱ्याच्या मुलीला लग्नासाठी मागणी घालण्याचे निमित्त करून कावजीने त्यास ठार मारिले.अफजलखानाचे भेटीवेळी छत्रपतींनी संभाजी कावजी व जीवा महाला यांना अंगरक्षक म्हणून नेले होते.

सभासद बखरीत प्रतापगडाच्या लढाईचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे,छत्रपतींनी उजवे हातचे बिचवियाचा मारा चालवून खानाची चरबी बाहेर काढली व चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले.'खाण याणी गलबला केला की मारीले मारीले,दगा जाहला,जलदीने धावा असे बोलीले मग भोई याणी जलदीने पालखी आणुन खानास पालखीस घालुन उचलोन चालिले तो इतकियात संभाजी कावजी हुद्देकरी याणे भोयाच्या पायाच्या पट्ट्याने ढोण सिरा तोडुन पालखी भुईस पाडली आणी खानाचे डोचके कापुन हाती घेऊन राजियाजवळ आला.'

पुढे शायिस्तेखानाच्या आक्रमणावेळी संभाजी कावजीचा मित्र बाबाजी राम हा खानास मिळाला,त्यामुळे छत्रपतींनी त्याची कानउघाडणी केली.ती सहन न झाल्यामुळे संभाजी कावजी सुध्दा खानास मिळाला.तेथे कावजीने घोड्यास चार पायावर उचलुन आपल्या ताकतीचे प्रदर्शन केले,'जोरावर होता,घोडा चहूं पाई धरून उचलला.'हे त्याचे शौर्य पाहून खानाने त्यास मौजे मलकर या ठाण्यास पाचशे स्वारांसह सलाबतखान दखनी याच्या तैनातीस ठेविले.पुढे प्रतापराव गुजर यांस,छत्रपतींनी त्याजवर पाठवून त्यास इ.स. १६६१ मध्ये ठार मारिले.



साहित्य प्रतिष्ठान


मावळा
साहित्य प्रतिष्ठान®

# रामजी पांगेरा

प्रतापगडाच्या युध्दात(दि.१० नोव्हेंबर १६५९)रामजी पांगेराने पराक्रम करून जावळीच्या जंगलात खानाच्या सैन्याची कत्तल केली होती.रामजी हा छत्रपतींचा मावळातील सहकारी होता.याचे जन्मस्थानाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही.नाशिक भागातील कण्हेरा किल्ल्याजवळ रामजी आपल्या सातशे सहकाऱ्यांसह तळ ठोकून होते.कारण मोघलांच्या फौजा कधी स्वराज्यावर चालून येतील याचा काही नेम नव्हता.

सन १६७१ साली दिलेरखान बऱ्हाणपुराहून सुमारे तीस हजार सैन्य घेऊन स्वराज्यावर चालून आला.नाशिक भागातील कण्हेरा किल्ला जिंकण्यासाठी तो चालून निघाला.ही बातमी कण्हेरा किल्ल्याजवळील रामजीस समजली.तीस हजाराच्या सैन्यापुढे सातशे मावळयांचा टिकाव लागणे शक्य नव्हते.रामजीने आपल्या मावळयांना एकत्र केले व त्यांना स्वराज्यासाठी लढावयास प्रवृत केले.मावळे हर हर महादेव चा गजर करत चवताळून उठले.कण्हेरा किल्ल्याच्या आश्रयास न जाता ते दिलेरखानाच्या फौजेची वाट पाहू लागले,जणू त्यांच्यात भवानीच संचारली होती.

दिलेरखान कण्हेरा गडाजवळ आल्याबरोबर दबा धरून बसलेल्या मावळयांनी त्याच्यावर हल्ला केला.हर हर महादेव चा गजर करत मावळे तुटून पडले,दोन्ही हाताने तलवार चालवत रामजी शत्रूवर तुटून पडले.मावळे हट्टास पेटले होते,अखेरीस मोघली सैन्य पळत सुटले.मराठ्यांच्या आक्रमणापुढे दिलेरखानास माघार घ्यावी लागली.कण्हेरा किल्याच्या परिसरात सातशे मावळयांनी तीस हजार गनिमांचा पराभव केला व पराक्रमी रामजी इतिहासात कायमचा अमर झाला.



# कोंडाजी फर्जंद

अवघ्या साठ मावळयानिशी पन्हाळगड ताब्यात घेणारा पराक्रमी वीर हा कोंडाजी होय.तुंगभद्रेपासून उत्तरेस अहिवंतापर्यंत अनेक गड राजांनी कब्जात घेतले होते.पण दख्खनचा दरवाजा असलेला पन्हाळगड त्यांना ताब्यात मिळाला नव्हता.राजेंनी दि.६ जून १७७२ रोजी रायगडावर आपल्या सहकाऱ्यांना ही सल बोलून दाखविली.

यावेळी कोंडाजी फर्जंद,राजेंना बोलिला की गड म्या घेतो.त्याने अवघे तीनशे हशम(मावळे)राजेंकडे मागितले.अवघ्या तीनशे मावळयानिशी पन्हाळगड जिंकावयास निघालेल्या कोंडाजीचे राजेंनी कौतुक करून त्यास सोन्याचे कडे दिधले.कोंडाजीने कोकणातून महाडमार्गे येऊन राजापुरास आपला तळ टाकला.राजापुर व पन्हाळा किल्ला हे अंतर आडवाटेने(जंगली रस्त्याने)अंदाजे ८०-९० कि.मी होते.हेरगिरीने वेष पालटून गडावर जाऊन त्यांनी गडाची पूर्ण माहिती काढली.गडावर अंदाजे दोन हजार गनिम होते.बाबूखान हा अदिलशाही किल्लेदार होता.

फाल्गुन वद्य त्रयोदशी(दि.६ मार्च १६७३)रोजी मध्यरात्री राजापुरातून येऊन फिरंगोजी गडाच्या जवळ पोहोचला.तीनशे मावळयापैकी त्यांनी निवडक साठ मावळे घेऊन गडावर हल्ला केला.तीन दरवाज्याजवळ असलेल्या कड्यावरून चढून त्यांनी गडावर प्रवेश केला.मध्यरात्री मराठे गडावर आल्यावर त्यांनी कापाकापीला सुरूवात केली.गडाचा किल्लेदार बाबूखान व कोंडाजी यांच्यात महाभयंकर युध्द जाहाले.अखेर कोंडाजीच्या तलवारीच्या वारात बाबूखानाचे मस्तक धडावेगळे झाले.किल्लेदार पडल्यामुळे खानाच्या सैन्यात गोंधळ उडाला.ते पळून जाऊ लागले.पण गडावरील साठ मावळयांनी त्यांची दाणादाण उडवून गड ताब्यात घेतला.अवघ्या साठ मावळयांनिशी गड ताब्यात घेणारा कोंडाजी खरोखरच वीर होता.



पन्हाळगड,याच मार्गाने कोंडाजी किल्ल्यावर चढले असावेत



# दर्यावीर मायनाक भंडारी

छत्रपती शिवरायांना स्वराज्यासाठी कोकणातून अमुल्य अशी रत्ने मिळाली. स्वराज्यासाठी जीव देणारी ही मंडळी होती.दौलतखान, इब्राहीमखान, लायजी पाटील, तुकोजी आंग्रे,मायनाक भंडारी आदी दर्यावीर राजेंना कोकणातून मिळाले.

दर्यावीर मायनाक भंडारी हे मराठी आरमाराचे सुभेदार होते.इ.स.१६७९ च्या ऑगस्ट महिन्यात छत्रपतींनी मायनाक भंडारीला मुंबईच्या जवळ असलेल्या खांदेरी-उंदेरी बेटांवर धाडून किल्ला बांधण्याचे ठरविले.कारण या किल्ल्यामुळे इंग्रजांना कोकणात हालचाल करणे दुरापास्त होणार होते.त्याकाळी राजेंनी इंग्रजाचा धोका ओळखला होता.मायनाक भंडारी किल्ला बांधत असताना इंग्रजानी त्यास अटकाव करण्याचा प्रयत्न केला.कॅप्टन विल्यम मिन्चीन,रिचर्ड केग्वीन,जॉन ब्रान्डबरी आदी नामांकीत सागरी सेनानींना पाठवून खांदेरी-उंदेरीला हल्ला केला.मायनाक भंडारीनी व मावळयांनी दिवसा युध्द व रात्री गडाची बांधणी असे दिवसरात्र काम करून मोठ्या पराक्रमाने,चिवटपणे लढून इंग्रजांचा पराभव केला व गडाची उभारणी केली.

सिद्दी आणि मुंबईकर इंग्रज यांच्या बरोबर मध्ये उभारल्या गेलेल्या या जलदुर्गामुळे सिद्दी आणि इंग्रज या दोघांचीही कोंडी झाली.सिद्दीला मुंबईकर इंग्रजांच्या आश्रयाला जाण्यापासून रोखले गेले,तर मुंबईकर इंग्रजांवर मराठ्यांची टांगती तलवार राहिली.दर्यावीर मायनाक भंडारी यांचे नाव इतिहासात कायमचे अजरामर झाले.



उंदेरी किल्ला दर्यावीर मायनाक भंडारीच्या पराक्रमाचा साक्षीदार




# जंजिरा किल्ल्याला शिड्या उभारणारा दर्यावीर लायजी पाटील

शिवरायांना कोकणात अनेक नररत्ने मिळाली.लायजी पाटील कोळी हे त्यापैकीच एक होत.अनेक कोळी बांधव शिवरायांच्या सैन्यात होते. आगरी, भंडारी, गावित, कोळी आदि कोकणातील मंडळी गलबते बांधण्यात पटाईत होती.संगमिरी हा गलबतातील नवीन युध्दप्रकार याच मावळयांनी आणला.

जंजिरा किल्ला हा कोकणातील सिध्दीचा गड,अनेक प्रयत्न करूनसुध्दा हा किल्ला मराठ्यांच्या हातात लागत नव्हता.छत्रपतींनी मोरोपंत पिंगळे वर या मोहिमेची जबाबदारी सोपविली.मोरोपंत घाटातील हशम(मावळे)घेऊन मुरूडला दाखल झाले.जंजिरावर हल्ला कसा करावयाचा याचा आराखडा आखत असताना लायजी पाटीलने जंजिरा किल्ल्याच्या तटाला समुद्रातून शिड्या लावण्याचा विचार सांगितला व स्वत:ही जबाबदारी अंगावर घेतली.मध्यरात्री छोट्या होड्यातून मावळयांना गडाच्या तटापर्यंत पोहोचवावे आणि मग शिड्यांच्या साह्याने गडावर चढून आतील हबश्यांचा बंदोबस्त करावा असे ठरले.

किल्ल्यावरील हबशांना थोडी जरी चाहूल लागली तरी सर्व मराठी मावळे मारले जाणार होते.लायजीने मोरोपंतास सांगितले आम्ही शिड्या लावतो,तुम्ही पाठोपाठ येणे.मध्यरात्री अंधारात वल्ह्यांचा आवाज न करता लायजीच्या होड्या जंजिराच्या तटाकडे निघाल्या.तटाजवळ पोहचल्यानंतर लायजीने व साथीदारांनी शिड्या तटावर लावल्या व ते मोरोपंताची वाट पाहू लागले.बराच वेळ निघून गेला प्रभात होण्याची वेळ आली तरी मोरोपंताच्या होड्या दिसेनात.शेवटी सिध्दीला आपला डाव कळेल म्हणून लायजीने हताश होऊन शिड्या काढण्याचा निर्णय घेतला व तो माघारी परतला.



लायजी कोळयाचा पराक्रम वाया गेला व जंजिरा जिंकण्याची एक सुवर्णसंधी मराठ्यांनी गमावली.पुढे संभाजीराजेंनी

राजापुरीच्या खाडीत भराव टाकून किल्ल्यावर हल्ला केला.पण त्याच सुमारास औरंगजेबने दक्षिणेस आघाडी उघडल्याने हाती आलेला विजय संभाजीराजेंनी सोडून द्यावा लागला व किल्ला शेवटपर्यंत अजिंक्य राहिला.

## जंजिरा किल्ला
## दर्यावीर लायजी पाटील कोळीच्या पराक्रमाचा साक्षीदार



# हिरोजी फर्जंद

सन ११ जून १६६५ च्या तहानुसार छत्रपती शिवाजीराजे औरंगजेबास भेटण्यासाठी आग्र्यास रवाना झाले.औरंगजेबाच्या पन्नासाव्या वाढदिवसा राजे औरंगजेबाच्या दरबारात हजर झाले.पण औरंगजेबने दरबारात राजेंचा अपमान केला,तसेच त्यांच्या निवासस्थानाभोवती पोलादखानाचे पहारे बसविले.स्वत:छत्रपती शिवराय,युवराज संभाजीराजे कैदेत अडकल्यामुळे स्वराज्यावर मोठे संकट उभे राहिले होते.


छत्रपती शिवरायांनी आपल्या चतुराईने संभाजीराजेंना मोघलांची मनसबदारी मिळवून दिली त्यामुळे संभाजीराजे मुक्तपणे संचार करू शकत होते,तसेच हिरोजी व मदारी म्हेतर यांस राजेंनी आपल्या सोबत ठेवून आपल्या सोबतच्या इतर मावळयांना बाहेर पाठविले.संभाजीराजेंना मनसबदारी मिळाल्यामुळे त्यांनी राजेंच्या सुटकेसाठी प्रयत्न चालू केले.संभाजीराजेंनी मावळयांना आग्र्याच्या बाहेर ठिकठिकाणी तैनात ठेवले.छत्रपती शिवरायांनी आजारी पडण्याची युक्ती करून आपली तब्येत चांगली व्हावी म्हणून आग्र्यातील मंदिर,मशिदी,गोरगरिब जनतेला मिठाईचे पेटारे पाठवयास सुरूवात केली.सुरूवातीस पोलादखानाचे सैन्य पेटारे काळजीपणे तपासत होते पण नंतर ते पेटारे तपासण्यास कुचराई करू लागले.अखेरीस संधी साधून दि १७ ऑगस्ट १६६६ ला राजें वेशांतर करून पेटारे घेऊन निघून गेले(राजें आग्र्यातून कसे निसटले याबद्दल इतिहासकारांमध्ये वादविवाद आहेत).राजेंच्या शामियान्यात हिरोजी फर्जंद छत्रपतींचे कपडे घालून झोपला.या घटनेच्या वर्णन सभासदाच्या बखरीमध्ये पुढीलप्रमाणे आहे.

हिरोजी फर्जंद पलंगावरी निजला होता.तो चार प्रहर रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला.चौकीचे पोलादखानाचे लोक कोठडीत येऊन पाहतात,तो राजे शेला पांघरून

निजलेले.पोर पाय रगडित होता.पोरास लोक पुसतात की राजे आज फार वेळ निजले?पोर म्हणतो की,'शीर दुखते'ऐसे पाहोन लोक जातात.तैसाच तीन प्रहर रोज हिरोजी निजला होता.तों प्रहर दिवस असतां हिरोजी उठोन,आपली पांघरूणे,चोळणा,मुंडासे घालून पोर बरोबरी घेऊन,बाहेर आला चौकीदारास पुसिले त्यांस हिरोजीने सांगितले की शीर दुखते,कोणी कोठडीत जाऊ लागेल त्यास मना करणे.आपण औषध घेऊन येतो.म्हणून चौकीदारास सांगून दोघे बाहेर गेले.रामसिंगाचे गोटास जाऊन त्यास एकांती वर्तमान सांगोन आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला.

संभाजीराजे,हिरोजी फर्जंद,मदारी म्हेतर यांच्यामुळे राजे सुखरूप औरंगजेबाच्या तावडीतून निसटले.

## आग्रा किल्ल्यासमोर लेखक



# कल्याणचा सुभेदार आबाजी महादेव

कल्याणचा विजापुरच्या दरबाराचा खजिना लुटण्याचा छत्रपती शिवरायांनी बेत आखला.छत्रपती शिवराय स्वत:या मोहिमेवर रवाना झाले.छत्रपतींच्या अगोदर आणखी एक मावळयांची तुकडी कल्याणच्या वाटेवर पोहचली होती.या तुकडीचे नेतृत्व करत होते आबाजी महादेव,त्यांच्यासोबत दादाजी कृष्ण,सखो कृष्ण लोकरे या मोहिमेत सामील झाले होते.विजापुरकरांचा खजिना ज्या वाटेने जाणार होता.त्या वाटेवरील जंगलात सर्व मावळे लपून बसले.

कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमंद हा कल्याणचा गोळा केलेला खजिना घेऊन आपल्या घोडदळासोबत विजापुरच्या वाटेला होता.त्याचा मुलगा आघाडीवर राहून सोबतच्या शिबंदीस सुचना देत होता.चढण,उतरण,चिखलरस्ता पार करत ते जंगलाच्या वाटेला लागले.अचानक हर हर महादेव ची रणगर्जना करत आबाजीच्या तुकडीने सुभेदारावर हल्ला केला.अचानक हल्ला झाल्यामुळे बेसावध असलेल्या अदिलशाही सैन्याची दाणादाण उडाली व सर्व खजिना मराठ्यांच्या हाती लागला.

खजिना घेऊन आबाजीच्या तुकडीने कल्याणवर चाल केली व कल्याण मराठ्यांच्या घोड्याच्या टापाखाली आले.कल्याणच्या नगारखान्यावर भगवा डोलाने फडकू लागला.कल्याणपाठोपाठ आबाजीच्या तुकडीने भिवंडीवर हल्ला करून भिंवडीला ही मराठ्यांच्या घोड्याच्या टापाखाली आणले.कल्याणच्या दिशेने येत असलेल्या राजेंना ही बातमी कळाली,राजे आनंदले.महाराजांसमोर कल्याणची लुट पेश करण्यात आली.आबाजींचा पराक्रम पाहून राजे बेहद खुश झाले व आबाजींस कल्याण प्रांताची सुभेदारी बहाल केली.

# गोदाजी जगताप
## पुरंदराचा पहिला रणसंग्राम गाजविणारे वीर

छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापनेस सुरूवात केली होती.शहाजीराजेंना पुणे जहागीर मिळाली होती.जिजाऊ आईसाहेब व शहाजीराजेंच्या मार्गदर्शनाखाली शिवबांनी मावळातील एक-एक किल्ला काबीज करावयास सुरूवात केली.तोरणा, सुभानमंगळ,रोहिडा असे किल्ले त्यांनी काबीज केले.विजापुरच्या अदिलशाही दरबारात शिवबांच्या स्वराज्य स्थापनेच्या खबरी येऊ लागल्या.शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी अदिलशाहने सन १६४८ साली फत्तेखानास धाडले.

फत्तेखानाने जेजूरीजवळील बेलसर येथे आपला तळ ठोकला होता.खानाच्या सैन्याने शिरवळजवळील सुभानमंगळ किल्ल्यावर हल्ला करून किल्ला काबीज केला.मराठ्यांचा हा पहिलाच पराभव होता.छत्रपतींनी कावजी मल्हार यास सुभानमंगळ भूईकोटावर चालून जाण्यास सांगितले.त्यांनी एका रात्रीत गड सर केला.तर फत्तेखानावर हल्ला करण्यासाठी बाजी पासलकर,कान्होजी जेधे,बाजी जेधे,गोदाजी जगताप बेलसरच्या छावणीवर गेले,अचानक हल्ला करून त्यांनी खानाच्या सैन्याची कत्तल केली व पुरंदरचा पायथा गाठला.

फत्तेखानचा सरदार मुसेखानाने पुरंदरावर हल्ला केला,पुरंदराला खानाच्या सैन्याचा वेढा पडला.गडाजवळ फत्तेखानाच्या सैन्याचे व मराठ्यांचे तुंबळ युध्द झाले.बाजी पासलकर,कान्होजी जेधे,गोदाजी जगताप यांनी गनिमांची कत्तल केली.फत्तेखानचा सरदार



मुसेखान व गोदाजी जगताप एकमेकाला भिडले.दोघात तुंबळ युध्द झाले.अखेरीस गोदाजीच्या वाराने मुसेखानाच्या छाताडाचा वेध घेतला व खान कोसळला.मराठ्यांनी स्वराज्याचा पहिला रणसंग्राम जिंकला पण बाजी पासलकर सारखा वीर रणी पडला.

## पुरंदराजवळील याच परिसरात मुसेखान व मराठयांत युध्द जाहाले



# पराक्रमी योध्दा सिधोजी निंबाळकर

महाराजांचा एक पराक्रमी सेनानी म्हणून सिधोजी निंबाळकरांची इतिहासात नोंद आहे. अदिलशाहच्या ताब्यातील पन्हाळा किल्ला जिंकल्यामुळे पिसाळलेल्या अदिलशाहने मग बहलोलखानाला महाराजांच्या चाल करावयास धाडिले.प्रचंड फौजफाटा घेऊन चाल करून येत असलेल्या बहलोलखानाचा सिधोजी निंबाळकर,सिद्दी हिलाल,विठोजी शिंदे,रूपाजी भोसले,सोमाजी मोहिते तसेच प्रतापराव गुजर या सेनानींनी गनिमी कावा करून फडशा पाडिला.

याच युध्दात सिधोजींनी बहलोलखानाच्या मदमस्त हत्तीस काबूत आणून महाराजांना भेट म्हणून पाठविला.सिधोजी महाराजांच्या आयुष्यातील शेवटच्या स्वारीस,जालन्याच्या लुटीत राजांसोबत होते.राजेंनी चार दिवस पेठा मारिल्या,शहर लुटून फन्ना केले,जडजवाहिर कापड,घोडे,उंट फस्त केले.मोगलाईचे महत्वाचे शहर मारिल्यामुळे मोघल संतप्त जाहले.मोघली फौज घेऊन रणमस्त खान चालून आला.त्याची गाठ महाराजांच्या सैन्याच्या शेवटच्या तुकडीशी संगमनेर जवळ पडली.

या युध्दात संताजी घोरपडे,सिधोजींनी मोठा पराक्रम गाजविला,पाच हजार फौजेनिशी मराठी सैन्याने रणमस्तखानास तीन दिवस झुंजविले त्यामुळे महाराजांना खजिना घेऊन सुरक्षित ठिकाणी जाता आले.पण दुदैवाने या लढाईत सिधोजींना वीरमरण आले पण त्यांचा पराक्रम इतिहासात अमर झाला.





# नावजी बलकवडे

छत्रपती शंभूराजेंच्या मृत्युनंतर औरंगजेबाने मराठ्यांवर जोरदार आक्रमण करून,मराठ्यांच्या ताब्यातील किल्ले घेण्याचा सपाटा चालविला होता.छत्रपती राजाराम याच सुमारास जिंजी किल्ल्यावर होते.राजगड,तोरणा,सिंहगड,पुरंदर असे बलाढ्य किल्ले मोघलांच्या ताब्यात आले होते.त्यामुळे मराठी फौजेची महाराष्ट्रातील हालचाल मंदावली होती.

हा किल्ला परत स्वराज्यात आणण्याची जबाबदारी राजाराम महाराजांनी नावजी लखमाजी बलकवडे यांच्यावर सोपविली सोबत मदतीला विठ्ठल कारकेंना धाडिले.२५ जून १६९३ रोजी राजमाची किल्यावरून त्यांनी मोहिमेला सुरूवात केली. सोबतीला दोर,शिड्या घेऊन मराठी मावळे सिंहगडाच्या पायी आले.वीस वर्षापुर्वीच्या तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमामुळे,घाबरलेल्या औरंगजेबाने चारी बाजूला सक्त पहारे लावले होते.त्यामुळे गडावर जाण्यासाठी सर्व मार्ग बंद झाले होते.

सुर्योदयानंतर गडावर नवे पहारेकरी गस्तीसाठी आले.या लवचिक संधीचा फायदा घेऊन नावजींनी तटाला शिड्या लावल्या व मराठे सैन्य गडावर घुसले.सकाळचे दाट धुके मराठ्यांच्या मदतीस धावून आले,मराठ्यांनी गस्तीवरील सैन्यांना कापून काढले.थोड्याच वेळानी विठ्ठल कारके सुध्दा शिड्या लावून गडावर पोहचले.गडावर गलका उडाला,"गनिम आया,भागो,भागो".पण प्रत्येक मराठी सैनिकात तानाजी मालुसरे संचारले होते.अखेरीस मराठ्यांची सरशी झाली व सिंहगड पुन्हा मराठ्यांच्या ताब्यात आला.

नावजी बलकवडे व विठ्ठल कारकेंच्या पराक्रमास खरोखरच तोड नव्हती,

धन्य ते मराठे वीर.........



# दर्याराजे कान्होजी आंग्रे

कान्होजीराजेंचा जन्म इ.स.१६६७ साली झाला.दर्याचा शिवाजी अशीही कान्होजीराजेंची ओळख आहे.कान्होजीराजे हे भारताच्या इतिहासातील प्रसिद्ध नाविक योद्धा होते.पुणे जिल्ह्यातील काळोसे हे त्यांचे मूळ गाव व संकपाळ हे मूळ आडनाव.काळोसेतील आंगरवाडी या भागामुळे त्यांच्या कुळास आंग्रे हे उपनाव प्राप्त झाले.कान्होजींचे वडील तुकोजी यांना छत्रपती शिवाजीराजेंच्या आरमारात २५ असामींची सरदारी होती.

औरंगजेब मराठ्यांना जिंकण्यासाठी १६८१ च्या अखेरीस महाराष्ट्रात आला. त्याच सुमारास कान्होजींच्या कोकणपट्टीतील कार्यास सुरुवात झाली होती. १६९४ ते १६९८ पर्यंत कान्होजींनी कोकणपट्टीतले मोगलांनी व इतरांनी काबीज केलेले मराठ्यांचे सर्व किल्ले जिंकून घेतले.छत्रपती राजारामांनी त्यांची ही कामगिरी पाहून त्यांना सरखेल हा किताब दिला.१६९६ मध्ये त्यांनी कुलाबा किल्ला जिंकून ते आपले मुख्य ठाणे केले.

पुढे छत्रपती राजारामांनी त्यांस मराठी आरमाराचा मुख्याधिकारी केले. राजारामांच्या मृत्यूनंतर (१७००) थोड्याच वर्षांत शाहूंची सुटका होऊन १७०७ मध्ये ते छत्रपतींच्या गादीवर आले. त्या दरम्यान राजारामांची पत्नी ताराबाई व पुतणे शाहू ह्यांत गादीबद्दल तंटा सुरू झाला होता.कान्होजींनी महाराणी ताराबाईंचा पक्ष घेऊन १७०७ ते १७१० च्या दरम्यान अनेक विजय मिळविले.



# दर्याराजे कान्होजी आंग्रे यांचे शिल्प



मावळा
साहित्य प्रतिष्ठान®

मावळा

ताराबाईंनी सावंतवाडी ते मुंबईपर्यंतच्या किनाऱ्याच्या संरक्षणार्थ मराठी आरमाराचे प्रमुख म्हणून कान्होजींना नेमले आणि इंग्रजांच्या मदतीने शाहूंनी कोणतीही हालचाल करू नये, या हेतूने राजमाचीचा किल्ला व भिवंडी प्रांताचा बंदोबस्त करण्यास कान्होजींना सांगितले.इ.स. १७१३ साली  शाहूंनी कान्होजीं विरुद्ध बहिरोपंत पिंगळे ह्यांस धाडले. कान्होजींनी त्यांचा पराभव करून त्यांस कैद केले.त्यामुळे छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथ या पेशव्यास कान्होजींवर धाडले. बाळाजीने कान्होजींबरोबर सलोखा करून तह केला. त्यात कान्होजींस कोकणकिनारपट्टीचे सर्व किल्ले मिळाले व त्यांनी छत्रपती शाहूचे अंकित बनून सालिना १२,००० रु. त्यास देण्याचे ठरले.त्याशिवाय त्यांची सरखेली कायम ठेवण्यात आली तसेच मराठी आरमाराचे सर्व आधिपत्य त्यांस दिले.अशा प्रकारे ते शाहूंच्या पक्षात सामील झाले व अखेरपर्यंत त्यातच निष्ठेने राहिले.

कान्होजींची सत्ता कोकण किनाऱ्यावर कोट मांडवेपासून त्रावणकोरपर्यंत पसरली. ही गोष्ट तत्कालीन इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज व डच ह्या परकीयांस आणि जंजिऱ्याच्या सिद्दीस बोचत होती. इंग्रज, डच, पोर्तुगीज व फ्रेंच ह्यांनी कधी स्वतंत्रपणे, तर कधी संयुक्त रीत्या त्यांवर चढाई केली. पण प्रत्येक वेळी त्या सर्वांचा पराभव झाला. आंग्र्यांच्या अंमलाखालील सागरी प्रदेशांतून जाणाऱ्या जहाजास दस्तक (परवाना) घ्यावयास भाग पाडून समुद्रावर त्यांनी आपले निर्विवाद स्वामित्व प्रस्थापिले आणि सिद्दीस वारंवार माघार घेण्यास भाग पाडले.

कुलाबा व विजयदुर्ग येथे जहाजे बांधण्यासाठी त्यांनी गोद्या बनविल्या. त्यांची जहाजे कच्छपासून त्रावणकोरपर्यंत सागरात निर्वेधपणे संचार करीत.कान्होजी सुदृढ व प्रेमळ होते.



तथापि त्यांचे हुकूम सक्तीचे व शिक्षा कडक असे. त्यांना मथुराबाई, लक्ष्मीबाई व गहिनाबाई या तीन धर्मपत्नी होत्या. त्यांना सहा मुलगे झाले. असा हा सागरी अनभिषिक्त राजा अलिबाग येथे मरण पावला. त्यांच्या मरणानंतर त्यांच्या मुलांत तंटे सुरू होऊन पुढे आंग्रे घराण्याची वाताहत झाली.

## दर्याराजे कान्होजी आंग्रे यांची समाधी




मावळा

# छत्रपती शिवराय व छत्रपती संभाजीराजें यांचे निष्ठावंत मुस्लिम सेनानी

छत्रपतींच्या जीवाला जीव देणारे अनेक मुस्लिम सरदार स्वराज्यात होते.नूरखान बेग हा पायदळाचा प्रमुख होता.सिद्दी अंबर वहाब हवालदार याने(जुलै १६४७)मध्ये कोंढाणा सर करताना मोठा पराक्रम गाजवला.सिद्दी इब्राहिम हा छत्रपती शिवरायांचा अंगरक्षक होता,अफजलखानाच्या भेटीच्या वेळी तो छत्रपती शिवरायांचा अंगरक्षक होता(१९ नोव्हेंबर १६५९),फोंड्याचा लढाईवेळी त्याने पराक्रम गाजविला(एप्रिल १६७५)आणि त्यावर स्वराज्याचे निशाण फडकावले.सिद्दी हिलाल हा घोडदळात अधिकारी होता,पन्हाळगडाच्या वेढ्यात(२ मार्च १६६०)त्याने शिवरायांच्या सुटकेसाठी मोठा पराक्रम गाजविला,तसेच उमराणीजवळ बहलोल खानाविरूध्द झालेल्या लढाईत(१५ एप्रिल १६७३)तो होता.नेसरीजवळ बहलोल खानाशी झालेल्या युध्दात प्रतापराव गुजराबरोबर मारल्या गेलेल्या सात वीरात सिद्दी हिलाल होता.

सिद्दी वाहवाह(सिद्दी हिलालचा पुत्र)हा घोडदळातील सरदार होता,पन्हाळगडाला सिद्दी जोहरशी झालेल्या लढाईत तो जखमी झाला(दि.२ मार्च १६६०).मदारी मेहतर हा छत्रपतींचा विश्वासू सेवक होता.आग्र्याच्या बंदोबस्तातून महाराजांना सुटतेवेळी याची मोठी मदत झाली(१७ ऑगस्ट १६६६).काझी हैदर हा छत्रपती शिवरायांचा वकील होता(सन १६७०-१६७३).हुसेनखान मियाना याने मसौदखानाच्या कर्नाटकातील प्रांतावर हल्ला करून बिळगी, जामखिंड, धारवाड आदि प्रांत जिंकला(मार्च १६७९).रुस्तमेजनमा हा महाराजांना विजापूर दरबाराच्या गुप्त बातम्या पाठवण्याचे काम करीत असे,हुबळीच्या लुटीच्या वेळी त्याने मोठी



साहित्य प्रतिष्ठान

कामगिरी पार पाडली(६ जानेवारी १६६५).दर्यासारंग हा मराठी आरमाराचा पहिला सुभेदार होता.त्याने मायनाक भंडारीसोबत खांदेरीवर(सन १६७९)विजय मिळवला.तर संभाजीराजेच्या कालात बसनूर(जानेवारी-फेब्रुवारी १६८५) लुटले. दौलतखान, इब्राहीम खान,सिद्दी मिस्त्री या आरमारातील अधिकाऱ्याने खांदेरी(१६७९) आणिसंभाजीराजेंच्या बसनूरच्या(जानेवारी-फेब्रुवारी १६८५)मोहिमेत मोठा पराक्रम केला.सुलतान खान हा सुभेदार पोर्तुगीजांकडून दारुगोळा मिळवण्यात यशस्वी झाला होता.इब्राहिम खान हा मराठ्यांच्या तोफखान्याचा प्रमुख होता.त्या काळात तोफखान्यातील सर्व गोलंदाज (तोफची) मुस्लीम होते.विजापूर आणि गोवळकोंड्यावरुन स्वराज्यात आलेल्या ७०० पठाणी पायदळ आणि घोडदळाने स्वराज्याची निष्ठापूर्वक सेवा केली.

छत्रपतीच्या काळात असे अनेक निष्ठावंत मुस्लीम सैनिक होते ज्याची माहिती आपणास ज्ञात नाही.






मावळा

# ई पुस्तकाचे लेखन – श्री दामोदर मगदूम

संशोधक अभियंता असलेल्या दामोदर मगदूम यांची ओळख



इतिहासाचे अभ्यासक,दुर्गप्रेमी,निसर्गछायाचित्रकार अशीही आहे. डी.वाय.पाटील अभियांत्रिकी कॉलेजमधून इलेक्ट्रॉनिक्सची पदवी प्राप्त केल्यानंतर,भारतीय अवकाश संशोधन संस्था(इस्त्रो) अहमदाबाद येथे संशोधन केले.उपग्रह दळणवळणातील उच्च पदवी प्राप्त केली,याच कालखंडात त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले.

त्यांना उपग्रह दळणवळणातील संशोधनासाठी इंटरनॅशनल युनियन ऑफ रेडिओ सायन्स,बेल्जियमचा यंग सांयटिस्ट पुरस्कार मिळाला,त्याच बरोबर इंडियन सायन्स कॉंग्रेसचा पुरस्कार मिळाला.मा.राष्ट्रपती डॉ.कलाम यांच्याकडून त्यांचा

राष्ट्रपती भवनात विशेष गौरव झाला.त्याचबरोबर इतर अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत.

नुकताच त्याच्या मराठी देशा या संकेतस्थळाला महाराष्ट्र शासनाचा सर्वोकृष्ट मराठी संकेतस्थळाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.सध्या ते माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या संस्थेमध्ये कार्यरत आहेत.

अधिक माहितीसाठी खालील ईमेलवर संपर्क करावा

www.marathidesha.com

marathidesha@gmail.com

मोबाईल :9421051889

ई साहित्य प्रतिष्ठान

दोस्त

हे पुस्तक कसं वाटलं ? आवडलं? अजून या विषयावर वाचायला आवडेल?

हे पुस्तक www.marathiriyasat.com या मेगासाईटचा एक भाग आहे. मराठ्यांचा दैदिप्यमान इतिहास आहे, मराठ्यांनी अटकेपार झेंडे गाडले, मराठ्यांनी स्वराज्य ही कल्पना भारतात प्रथमच सिद्ध केली. पण हे फ़क्त म्हणण्यापुरतं झालं. हा इतिहास आताच्या किती तरुणांना माहिती असतो. या इतिहासातले असंख्य शिलेदार आहेत ज्यांची नांवेसुद्धा आज लोकांना माहित नाहीत. बाजी पासलकर आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्यातला फ़रकही आजच्या तरुणांना माहित नाही. आपला हा भव्य इतिहास आपल्या आजच्या पिढीला कळला पाहिजे. आपल्या शरीरात दौडणार्‍या रक्तात कोणता DNA आहे ते या तरुणांना कळायलाच हवे. पण कसे? हे काम करणार कोण? कोणी एकटा दुकटा हे करू शकेल का? ई साहित्य प्रतिष्ठान या संस्थेने हा विडा उचलला आहे. मराठी देशा, गडवाट अशा अनेक वेबसाईट्सच्या सहाय्याने मराठी रियासत ही एक भव्य वेबसाईट उभी रहात आहे. या वेबसाईट मध्ये प्रत्येक शिलेदाराची ओळख असेल. प्रत्येक युद्धाची आणि तहाची माहिती असेल. प्रत्येक किल्ल्याची इत्थंभूत माहिती असेल. चाळीस तरुण लेखकांची एक फ़ौज, मोठ्या इतिहासकारांच्या मार्गदर्शनाखाली असे अभ्यासपूर्ण लेख आणि पुस्तके लिहून या वेबसाईटवर सादर करणार आहेत. ई साहित्य प्रतिष्ठानचया सव्वा लाख वाचकांच्या भॆटीला हे सर्व येत आहे.

आपण यात सहभागी होऊ इच्छिता. काही लिहू इच्छिता? काही माहिती देऊ शकता? फ़ोटो? चित्रे? आपल्या मित्रांना यात सामिल करू इच्छिता?

कृपया लिहा : esahity@gmail.com

वेबसाईटला भेट द्या : www.marathiriyasat.com

ई साहित्य प्रतिष्ठानच्या संपूर्ण माहितीसाठी www.esahity.com

